**जलसंपदा विभागातील यांत्रिकी संघटनेअंतर्गत करण्यांत येणा-या यांत्रिकी कामासाठी कंत्राटदार नोंदणी, नियम**

**महाराष्ट्र शासन**
**जलसंपदा विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण १०.०९/५७/(२५/०९)/यांत्रिकी**
**मंत्रालय, मुंबई-३२**
**दिनांक. २९/७/२०११**

**प्रस्तावना-**

जलसंपदा विभागाच्या अखत्यारीतील यांत्रिकी संघटनेमार्फत प्रामुख्याने कालवा स्वच्छता,मातीकाम, व्दार कामे, उपसा सिंचन योजना इत्यादी कामे करण्यात येतात. सदर कामे करतांना जी कामे खात्यामार्फत करणे शक्य होत नाही अशी कामे तातडीची निकड विचारात घेऊन बाहय अभिकरणा मार्फत करुन घ्यावी लागतात. बाहय अभिकरणामार्फत करुन घ्यावयाच्या कामात प्रामुख्याने खालीलप्रमाणे वर्गवारी येते.

१) व्दारे व उच्चालक निर्मिती, उभारणी, दुरुस्ती कामे. तसेच यंत्रसामुग्री,उपसा सिंचन यंत्रसामुग्री,निगा,दुरुस्ती कामे,
२) उपसासिंचन योजना, पूरवठा, उभारणी व चाचणी कामे.

जलसंपदा विभागाअंतर्गत करण्यांत येणारी सदरील यांत्रिकी कामे नोंदणीकृत कंत्राटदाराकडून करुन घेण्याचे प्रस्तावित आहे त्यामुळे "कंत्राटदार" म्हणून नोंदणी करणे बाबत कंत्राटदार नोंदणीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता यानुषंगाने शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या नियम व मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन जलसंपदा विभागअंतर्गत करण्यांत येणा-या यांत्रिकी कामासाठी कंत्राटदार नोंदणीबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

**शासन निर्णय** - यांत्रिकी संघटनेअंतर्गत करण्यांत येणा-या यांत्रिकी कामांसाठी खाली नमूद कार्यप्रकारामध्ये कंत्राटदाराची नोंदणी करणे आवश्यक राहील.

(I) - यांत्रिकी संलग्न कामे ( व्दारे व उच्चालक निर्मीती, उभारणी, दुरुस्ती,संयत्रे दुरुस्ती तसेच पंपींग यंत्रसामुग्री प्रचलन, निगा व दुरुस्ती, इत्यादी कामे)

(II)- उपसा सिंचन योजना, पुरवठा,उभारणी व चाचणी कामे.

वरील कार्यप्रकारासाठी कंत्राटदारांच्या क्षमतेनुसार खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यात येत आहे.

**कंत्राटदारांच्या नोंदणीचे वर्गीकरण**

(I) - **यांत्रिकी संलग्न कामे (व्दारे व उच्चालक निर्मिती, उभारणी, दुरुस्ती, सयंत्रे दुरुस्ती, तसेच पंपीग यंत्रसामुग्री प्रचलन निगा व दुरुस्ती इत्यादी )** - या कार्यप्रकारासाठी खालील प्रमाणे कंत्राटदार नोंदणीची वर्गवारी करण्यात येत आहे.

| कंत्राटदाराचा वर्ग | **अ** | **ब** | **क** | **ड** | **इ** |
|---|---|---|---|---|---|
| काम करण्याची कमाल मर्यादा (रु.लक्ष) | मर्यादा नाही | २०० | ७५ | ३० | ५ |

(II)- **उपसा सिंचन योजना पुरवठा, उभारणी व चाचणी कामे** - या कार्यप्रकारासाठी कंत्राटदार नोंदणी करिता खालील प्रमाणे वर्गवारी राहील.

| कंत्राटदाराचा वर्ग | अ | ब | क |
|---|---|---|---|
| काम करण्याची कमाल मर्यादा (रु.लक्ष) | मर्यादा नाही | १००० | ५०० |

यांत्रिकी कामांच्या कार्यप्रकारानुसार "I" व "II" या कार्यप्रकारानुसार कंत्राटदार नोंदणीचे नियम, अटी व मार्गदर्शक सूचना इ. चा तपशील सोबतच्या परिशिष्ट १ व २ येथे व नोंदणी नमुना अर्ज, नोंदणीकृत कंत्राटदार नोंदवही, सुशिक्षित बेरोजगार नोंदणीअर्ज, कामांची माहिती, नुतनीकरण माहिती, पडताळणी अहवाल, कागदपत्रांची सूची, यांची माहिती परिशिष्ट-३ ते ९ मध्ये देण्यात आली आहे.

सदर शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०११०७२९११४६०६००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

**(रा. र. शहा)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत- मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा.मंत्री जलसंपदा (मकृखोविम वगळून) यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री जलसंपदा (मकृखोविम) यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री जलसंपदा यांचे खाजगी सचिव जलसंपदा
सचिव (जलसंपदा) जलसंपदा विभाग यांचे स्वीय सहाय्यक,
सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग यांचे स्वीय सहाय्यक,
महालेखापाल-१, मुंबई/महालेखापाल-२, नागपूर,
वित्त विभाग/सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,
सर्व मुख्य अभियंता व सह सचिव/सर्व उपसचिव, जलसंपदा विभाग, मत्रालय,
सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय,

प्रत- माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी
कार्यकारी संचालक कृष्णा /तापी/ गोदावरी/विदर्भ/कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, महाराष्ट्र
सर्व मुख्य अभियंते,जलसंपदा विभाग
सर्व अधीक्षक अभियंते, यांत्रिकी मंडळ (उ.सं.)/द्वारे, पुणे,कोल्हापूर,नागपूर,नांदेड जलसंपदा विभाग,
सर्व अधिकारी/ कार्यासन अधिकारी, जलसंपदा विभाग, मंत्रालय,

**जलसंपदा विभागातील यांत्रिकी संघटनेअंतर्गत करण्यांत येणा-या यांत्रिकी कामासाठी कंत्राटदार नोंदणी साठी नियम व अटी**

## परिशिष्ट-१

## ● नियम व अटी

**अ) यांत्रिकी संलग्न कामे ( व्दारे व उच्चालक निर्मीती, उभारणी, दुरुस्ती ,सयंत्रे दुरुस्ती,पंपीग यंत्रसामुग्री प्रचलन, निगा व दूरुस्ती इ.) करीता कंत्राटदार नोंदणीचे नियम**

कंत्राटदारांच्या कामाच्या क्षमतेनुसार व्दारे व उच्चालक निर्मीती, उभारणी,दुरुस्ती,सयंत्रे दुरुस्ती, पंपीग यंत्रसामुग्री प्रचलन, निगा व दुरुस्ती इ. कामांची आर्थिक व तांत्रिक क्षमता, वर्गवारी, किंमान सॉलवन्सी , वार्षिक उलाढाल , हाती असलेल्या कामाची किंमत, नोंदणी, दर्जावाढ, पुर्णनोंदणी इ. मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी याचा तपशील खालील तक्त्यानुसार राहील. **प्रपत्र -अ-१**

| कंत्राटदाराचा वर्ग | काम करण्याची कमाल मर्यादा (रु.लक्ष) | किमान सॉलवन्सी (रु. लक्ष) | सरासरी वार्षिक उलाढाल (रु.लक्ष) | हाती घेतलेल्या कामांची किंमत (रु.लक्ष) | कंत्राटदार नोंदणी शुल्क (रुपये) | नोंदणी मंजूर करणारे सबंधित सक्षम प्राधिकारी | नोंदणी प्रमाणपत्र व इतर कार्यवाही करणारे सबंधित सक्षम प्राधिकारी | संबंधित यांत्रिकी कार्यप्रकाराच्या कामाचा पुर्वानुभव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** | **९** |
| **अ** | मर्यादा नाही | ६० | २०० | ३०० | ५००० | सचिव,(जलसंपदा विभाग) | का.अ. (यां.) | किमान ५ वर्ष |
| **ब** | २०० | २० | ७५ | १०० | २००० | मु.अ. (यां) | का.अ. (यां.) | किमान ५ वर्ष |
| **क** | ७५ | ७.५ | ३५ | ५० | १५०० | मु.अ. (यां) | का.अ. (यां.) | किमान ३ वर्ष |
| **ड** | ३० | ३ | १५ | २० | १००० | अ.अ. (यां) | का.अ. (यां.) | किमान २ वर्ष |
| **इ** | ५ | १ | १.५ | २ | ५०० | का.अ. (यां.) | का.अ. (यां.) | किमान १ वर्ष |

व्दारे व उच्चालक निर्मीती,उभारणी,दूरुस्ती, सयंत्रे दुरुस्ती, पंपीग यंत्रसामुग्री प्रचलन, निगा व दूरुस्ती इत्यादी कामांच्या कंत्राटदार नोंदणी साठी किमान आवश्यक मनुष्यबळ व किमान आवश्यक यंत्रसामुग्री खालीलप्रमाणे राहील.

**प्रपत्र -अ-२**

| **अ) किमान आवश्यक मनुष्यबळ** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| कंत्राटदाराचा वर्ग | **अ** | **ब** | **क** | **ड** | **इ** |
| यांत्रिकी पदवीधारक | १ | १ | ० | ० | ० |
| यांत्रिकी पदविकाधारक | २ | १ | १ | १ | ० |
| पर्यवेक्षक(अनुभवी आय.टी.आय. धारक) | ३ | २ | १ | १ | १ |
| कुशल कामगार (आय.टी.आय) | ८ | ५ | ३ | २ | १ |
| एकूण | १४ | ९ | ५ | ४ | २ |
| **ब) किमान आवश्यक यंत्रसामुग्री** | | | | | |
| डिझेल/ इलेक्ट्रीक वेल्डींग प्लँट | ४ | ३ | २ | १ | १ |
| ड्रिलींग मशिन | २ | २ | १ | १ | १ |
| ग्राईडिंग मशिन | १ | १ | १ | १ | १ |
| हैड्रॉलिक प्रेस | १ | १ | ० | ० | ० |
| चेन पुली ब्लॉक | ३ | २ | १ | १ | १ |
| विविध टुल किट | ३ | २ | १ | १ | १ |
| गॅस कटींग सेट | ४ | ३ | १ | १ | ० |
| एकूण | १८ | १४ | ७ | ६ | ५ |

**ब) उपसा सिंचन योजना कामे ( पूरवठा, उभारणी व चाचणी ) या कार्यप्रकारासाठी कंत्राटदार नोंदणी वर्गीकरण.**

कंत्राटदाराच्या क्षमतेनुसार उपसा सिंचन योजना (पुरवठा, उभारणी व चाचणी ) या कामांची आर्थिक व तांत्रिक क्षमता, वर्गवारी, किमान सॉलवन्सी, वार्षिक उलाढाल, हाती असलेल्या कामाची किंमत, नोंदणी , दर्जावाढ, पुर्णनोंदणी इ. मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी याचा तपशील खालीलप्रमाणे राहील.

**प्रपत्र -ब-१**

| कंत्राटदाराचा वर्ग | काम करण्याची क्षमता (रु.लक्ष) | किमान सॉलवन्सी (रु. लक्ष) | सरासरी वार्षिक उलाढाल (रु.लक्ष) | हाती घेतलेल्या कामांची किंमत (रु.लक्ष) | नोंदणी शुल्क रुपये | नोंदणी मंजूर करणारे सबंधित सक्षम प्राधिकारी | नोंदणी प्रमाणपत्र व इतर कार्यवाही करणारे सबंधित सक्षम प्राधिकारी | उपसा सिंचन विषयक पंपगृहातील विद्युत व यांत्रिकी संलग्न कामाचा किमान पुर्वानुभव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** | **९** |
| **अ** | मर्यादा नाही | २०० | ७५० | ९०० | १५,००० | सचिव (ज.वि.) | का.अ. (यां.) | किमान ५ वर्ष |
| **ब** | १००० | १०० | ३०० | ४५० | १०,००० | मु.अ. (यां.) | का.अ. (यां.) | किमान ३ वर्ष |
| **क** | ५०० | ५० | १५० | २०० | ८००० | अ.अ. (यां.) | का.अ. (यां.) | किमान २ वर्ष |

उपसा सिंचन योजना पुरवठा, उभारणी व चाचणी या कामाच्या कंत्राटदार नोंदणीसाठी किमान आवश्यक मनुष्यबळ व किमान आवश्यक यंत्रसामुग्री खालीलप्रमाणे राहील.

**प्रपत्र - ब-२**

| **अ) किमान आवश्यक मनुष्यबळ** | | | |
|---|---|---|---|
| कंत्राटदाराचा वर्ग | **अ** | **ब** | **क** |
| पदवीधारक (यांत्रिकी/विद्युत) | ३ | २ | १ |
| पदविकाधारक (यांत्रिकी/विद्युत) | ३ | २ | १ |
| पर्यवेक्षक(अनुभवी आय.टी.आय. धारक) (यांत्रिकी /विदयुत) | ३ | २ | १ |
| कुशल कामगार (आय.टी.आय) (यांत्रिकी /विधुत) | ५ | ३ | २ |
| एकूण | १४ | ९ | ५ |
| **ब ) किमान आवश्यक यंत्रसामुग्री** | | | |
| डिझेल /इलेक्ट्रिक वेल्डींग सेट | ३ | २ | १ |
| ड्रिलींग मशिन | ३ | २ | १ |
| ग्राईडिंग मशिन | ३ | २ | १ |
| हैड्रॉलिक ग्रीस मशिन | २ | १ | १ |
| हैड्रॉलिक प्रेस | १ | १ | १ |
| चेन पुली ब्लॉक | १ | १ | १ |
| गॅस कटींग सेट | २ | १ | १ |
| विविध टुल्स व गेजेस (पंपीग यंत्रसामुग्री कामांशी संबंधीत जसे स्लींग,बेअरींग पुलर .फिलर गेज,मास्टर गेज,स्पिरीट लेवल, टॅकोमिटर, मेगर, एनर्जी मिटर इ.) | २ सेट | १ सेट | १ सेट |

(**टिप :-** उपसा सिंचन योजना पुरवठा, उभारणी व चाचणी या कामासाठी वरील प्रपत्रात नमूद पदवीधारक, पदविकाधारक, पर्यवेक्षक, कुशल कामगार (किमान आय.टी.आय धारक) यांचे उपरोक्त **“अ”** व **“ब”** वर्गामध्ये दर्शविलेल्या संख्येमध्ये किमान एक यांत्रिकी व एक विदयुत मनुष्यबळ आवश्यक राहील.)

## परिशिष्ट-२

# ● सर्वसाधारणः नियम व अटी

**अ) सर्वसाधारणः**

१. कंत्राटदार कोणत्याही यांत्रिकी विभाग कार्यालयाकडे कंत्राटदार नोंदणी अर्ज व नियमावली विहित शुल्क भरुन प्राप्त करु शकेल. कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्र मिळाल्या नंतर यांत्रिकी संघटनेच्या कोणत्याही विभागात त्या त्या वर्गवारीच्या कामासाठी काम करण्यास मंजूर कालावधीसाठी पात्र ठरेल.

२.निवेदन अर्जाची किंमत रुपये २५०/- राहिल.

३.प्रथम नोंदणी मुदतीचा कालवधी ३ वर्ष असेल त्यानंतरच्या नुतनीकरणाची मुदत २ वर्षे राहील. तथापि कंत्राटदाराकडील जागेचे भाडे करारनामा संपुष्टात येत असेल तर त्या भांडेकराराच्या तारखेपर्यंत नुतनीकरणाची मुदतवाढ राहील.

४. बेरोजगार अभियंत्यांचे कंत्राटद्वारे नोंदणीकरण प्रचलित शासन निर्णयाप्रमाणे राहील परंतु उपसा सिंचन योजनां पुरवठा,उभारणी व चाचणी या कामासाठी मुळ उत्पादक आवश्यक असल्याने उपसा सिंचन योजनां पुरवठा,उभारणी व चाचणी या कामांच्या कंत्राटदार नोंदणीसाठी बेरोजगार अभियंते पात्र ठरणार नाहीत.

**ब) नोंदणी**

१) नोंदणीसाठी इच्छूक कंत्राटदाराने नोंदणी करणा-या सक्षम प्राधिका-याकडे परिश्ष्टि-३ मध्ये देण्यात आलेल्या विहित नमुन्यात अर्ज सादर करावा. अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडावीत.

२) कंत्राटदाराचे ऑफिस/कर्मशाळेच्या मान्यताप्राप्त व नोंदणीकृत प्रमाणपत्राची प्रत, सक्षम प्राधिका-यांनी दिलेले सॉल्व्हँसी सर्टिफिकेट, संबधीत जिल्हयाचे जिल्हाधिकारी/उप विभागीय अधिकारी यांचेकडील पतदारी प्रमाणपत्राव्दारे किंवा बॅंकेच्या प्रमाणपत्राव्दारे पुष्टी दिलेल्या वित्तीय दर्जा बॅंकेचे पतदारी प्रमाणपत्र पुढील नमुन्यात सदर करणे आवश्यक राहील.

-: पतदारी प्रमाणपत्रः-

असे प्रमाणित करण्यात येते की, आमच्या सपुर्ण महिती प्रमाणे सर्वश्री/श्री.मेसर्स -------------------हे आमच्या बॅंकेचे प्रतिष्ठित ग्राहक असून रुपये -------- (रु.अक्षरात-------------------- ----) एवढया रक्कमेच्या मर्यादे पर्यन्त त्यांच्याशी व्यवहार करता येईल.या प्रमाणपत्रा बाबत बॅंकेने किंवा तिच्या कोणत्याही अधिका-याने हमी अगर जबाबदारी घेतलेली नाही.

(३) नोंदणीा प्रयोजनासाठी पतदारी प्रमाणपत्र ज्या तारखेस देण्यात आले असेल त्या तारखेनंतर बारा महिन्यापेक्षा अधिक कालावधीसाठी पतदारी प्रमाणपत्र स्विकृत्त होणार नाही.

(४) राज्याबाहेरील कंत्राटदारांनी सादर केलेले महसूल खात्याचे “पतदारी प्रमाणपत्र” स्विकारता येईल तथापी राष्ट्रीयकृत/श्येडयुल बॅंकेच्या “पतदारी प्रमाणपत्रा”च्या बाबतीत जिच्या महाराष्ट्रात शाखा आहे अशाच बॅंकेचे प्रमाणपत्र असावे.

(५) भागीदारीतील अभिकरण/कर्मशाळाच्या बाबतीत भागीदारी करारनाम्यात सर्व भागीदार हे अभिकरणाच्या सर्व व्यवहारासाठी एकत्रितरित्या जबाबदार आहेत असा स्पष्ट उल्लेख असावा व त्याबाबतचे अभिकरणांचे प्रमाणपत्र सादर करावे.

(६) इच्छूक कंत्राटदारानी ज्या वर्गात नोंदणी करु इच्छित आहे त्यावर्गासाठी आवश्यक असलेल्या कामाच्या अनुभवाच्या कालावधीत पूर्ण केलेल्या किंवा त्यांच्या हातात सध्या चालू असलेल्या कामांची माहिती खालील प्रपत्रात सादर करावी. या कामाबाबतचे साक्षांकीत कार्यादेशाच्या प्रती सोबत पूरावा म्हणून जोडावेत, तसेच, पूर्ण केलेल्या कामा बाबत ते

समाधानकारकरित्या पूर्ण केल्या बाबतच्या प्रमाणपत्राच्या साक्षांकीत प्रती देखील सोबत सादर करणे आवश्यक राहील.

| अक्रं | कार्यालयाचे नांव | कामाचा तपशिल | कामाची एकुण किमंत | कार्यादेश क्रमांक व दिनांक | काम सुरु केल्याचा दिनांक | काम पूर्ण केल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |

**क) आयकर निपटारा प्रमाणपत्राऐवजी खालील कागदपत्रे जोडावीत.**

(१) ज्या कंत्राटदारांची वार्षिक उलाढाल रुपये ४०.०० लाखापेक्षा अधिक किंवा वेळोवेळी निर्गमीत होणा-या शासन निर्णया मधील निर्देशानुसार आवश्यक उलाढाली पेक्षा जास्त आहे, अशा प्रकरणी आयकर अधिनियम १९६१ च्या कलम ४४ एबी नुसार सनदी लेखापालाकडून (Chartered Accountant) लेखापरिक्षित ताळेबंद (Audited Balance sheet) नफा तोटयाच्या लेख्यासह (Profit & Loss Account) सादर करणे आवश्यक राहील.

(२) ज्या कंत्राटदारांची वार्षिक उलाढाल रुपये ४०.०० लाखापेक्षा कमी आहे. अशा कंत्राटदारांना आयकर अधिनियम १९६१ मधील कलम ४४ एबी अन्वये लेखा परिक्षण अनिवार्य नसल्यामुळे लेखापरिक्षण करुन घेतलेले नसेल अशा प्रकरणी "स्टेटमेंट ऑफ टोटल इनकम," कॉट्रॅक्ट रिसीप्टसह आयकर विभागाच्या मान्य प्रचलित नमुन्यात सनदी लेखापालाकडून प्रमाणित केलेले असावे.

(३) ज्या कंत्राटदाराच्या "लेखा परिक्षित ताळेबंद" मध्ये कंत्राटदाराच्या उलाढाली संदर्भात काही आक्षेपार्ह माहिती उघडकीस आल्यास, ज्या विभागाकडून प्रस्ताव प्राप्त झाला, त्या विभागाच्या कार्यकारी अभियंता मार्फत संबंधीत कंत्राटदारा विरुध्द भारतीय दंड संहितेनुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. तसेच संबंधीत सनदी लेखापरीक्षकाविरुध्द उचित कार्यवाही करण्यासाठी इन्स्टिटयूट ऑफ चार्टड अकाऊटट ऑफ इंडिया, यांना कळविण्यात येईल.

(४) कंत्राटदाराने वर नमुद केलेल्या कागदपत्राच्या व्यतिरिक्त आयकर विवरणपत्र दाखल केल्याबाबतच्या पोंच पावतीची (Acknowledgment of income tax return filed) सत्यप्रत सादर करावी.

**ड) कंत्राटदाराने खालील प्रमाणे स्वतःच्या लेटर पॅडवर माहिती सादर करावी.**

१) कंत्राटदाराने नियुक्त केलेला तांत्रिक कर्मचारी वर्ग त्यांची अर्हता व अनुभव याबाबतची माहिती सादर करावी. कंत्राटदाराने प्रथम नोंदणी करतांना त्याच्याकडे कार्यरत कर्मचाऱ्यांची पदवी/पदविका प्रमाणपत्र व तसेच कर्मचाऱ्यांच्या नेमणुकीचा पुरावा म्हणुन व्यवसाय कराचे नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील,

२) कंत्राटदाराला ज्या वर्गात नोंदणी करावयाची आहे त्या वर्गासाठी आवश्यक असलेल्या व त्यांच्या मालकीच्या यंत्रसामुग्रीची यादी, तिची सध्याची स्थिती व ती कोठे स्थीत आहे याबाबतची माहिती

३) सदर शासन निर्णयातील "I" कार्यप्रकारातील (व्दारे व उच्चालक निर्मिती,उभारणी,दुरुस्ती, सयंत्रे दुरुस्ती, तसेच पंपीग यंत्रसामुग्री प्रचालन, निगा व दुरुस्ती इ.) कामाच्या कंत्राटदार नोंदणी करीता वर्ग-अ व वर्ग-ब कंत्राटदार नोंदणीसाठी प्रपत्र-१-अ नुसार स्वतःच्या मालकीची किमान आवश्यक यंत्रसामुग्री असणे आवश्यक असून वर्ग-क, ड, ई संवर्गासाठी सदर अट शिथील करुन किमान भाडे तत्वावर यंत्रसामुग्री असणे आवश्यक राहील. तसेच वर्ग क,ड व ई करिता त्या वर्गासाठी आवश्यक असलेली यंत्रसामग्री भाडेतत्वावर असल्यास त्या बाबतचे मूळ मालकाशी करारपत्राच्या केलेल्या प्रती व शपथपत्र (Affadavit) देणे आवश्यक आहे.

उपसा सिंचन योजनां पुरवठा,उभारणी व चाचणी इ. कामांच्या कंत्राटदार नोंदणी करीता सर्व वर्गासाठी (अ,ब,क) प्रपत्र ब-२ नुसार स्वतःच्या मालकीची किमान आवश्यक यंत्रसामुग्री असणे आवश्यक आहे.

४) कंत्राटदार नोंदणीसाठी संबंधितानी मुल्यवर्धित कर व सेवाकर ( व्हॅट व सर्व्हिस टॅक्स) प्रमाणपत्र सादर करावे.

५) जागा मालकी हक्काने वा भाडे तत्वावर असल्यास भाडे करारनामाची नोंदणीकृत प्रत सादर करावे.

६) शॉप ॲक्ट/एस.एस.आय. नोंदणीचे प्रमाणपत्र सादर करावे.

**इ) कंत्राटदाराने नोंदणी अर्ज सादर केल्यानंतर करावयाची कार्यवाही**

१) कंत्राटदाराने सादर केलेली सर्व कागदपत्रे नोंदणी सक्षम प्राधिकारी कंत्राटदारास परत न करता जतन करुन ठेवतील.

२) नोंदणीसाठी अर्ज करणा-या कंत्राटदाराने त्याला ज्या वर्गामध्ये नोंदणी करावयाची आहे अशा वर्गासाठी नमुना अर्जासोबत नोंदणी शुल्काची ५०%एवढी रक्कम भरावी सदर भरलेली रक्कम परत केली जाणार नाही. त्याचा अर्ज स्विकारण्यात आल्यास नोंदणी शुल्काची उर्वरित ५०% रक्कम कंत्राटदारास भरणे बंधनकारक राहील. अशी नोंदणी शुल्काची रक्कम “०७०१-मध्यम प्रकल्प-८०० (इतर जमा) (०१) (१२) ०७०१०६८१”, या शिर्षाखाली जमा करण्यात येईल.

३) अर्जाचे परिनिरीक्षण केल्यानंतर एखादा कंत्राटदाराने ज्या वर्गाच्या नोंदणीसाठी अर्ज केला आहे, त्या वर्गासाठी तो अपात्र असल्याचे सक्षम प्राधिका-याची खात्री पटल्यावर निम्न वर्गामध्ये नोंदणी करण्यासाठी त्यांच्या अर्जाची शिफारस करतील त्यासाठी वेगळा अर्ज करण्याची किंवा अर्जाचे वेगळे शुल्क भरण्याची आवश्यकता राहणार नाही. कंत्राटदाराची नोंदणी “मंजुरी” करण्यासाठी मुख्य अभियंता/ अधीक्षक अभियंता यांचे कडे प्रस्ताव सादर करतांना सबंधित कार्यकारी अभियंता यांनी सर्व अटी व शर्तीची पूर्तता झाल्याची खात्री करावी.

४)भागीदार आणि प्रमुख तांत्रिक कर्मचारी यांच्यामधील प्रत्येक बदल किंवा यंत्रसामग्रीची विल्हेवाट याबाबतची माहिती कंत्राटदाराने नोंदणी करणा-या अधिका-यास वेळोवेळी कळविणे बंधनकारक राहील.

५) महाराष्ट्र किंवा इतर राज्यात केलेला नोंदणीकृत भागीदारी विलेख (Parternership/Deed) स्विकारता येईल, तथापि भागीदारी विलेख चे पावर ऑफ ॲटर्नी ची सत्यप्रत सादर करावी.

६) कंत्राटदार नोंदणीबाबत आवश्यक अंतिम कार्यवाही करणा-या सक्षम प्राधिका-यांने नोंदणीची कार्यवाही परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यावर ३० दिवसात पूर्ण करावी. कंत्राटदार नोंदणीची अंतिम कार्यवाही वरिष्ठ कार्यालयामार्फत करावयाची असल्यास नोंदणीची सर्व कागदपत्रे उचित कार्यवाहीसाठी परिपूर्ण अर्ज प्राप्त झाल्यापासून १५ दिवसात वरिष्ठ कार्यालयास पडताळणीसह सादर करावी व ३० दिवसांच्या आत कार्यवाही करावी.

७) संपूर्ण नोंदणी प्रक्रिया तीन महिन्याच्या आत पूर्ण करण्यात यावी.

८) कंत्राटदारांनी ते ज्या वर्गात नोंदणी करु इच्छित असेल अशा वर्गाच्या २ वर्ग कमी वर्गाच्या कमाल काम करण्याच्या क्षमतेच्या रकमे इतके किमान २ कामे केलेली असणे आवश्यक आहे. (उदा. वर्ग अ मध्ये नोंदणी करण्यास इच्छुक असेल तर वर्ग क ची कमाल मर्यादा) खाजगी कामांना १०० टक्के महत्व

(Weightage ) देण्यात यावे व कामाबाबत CA/ Registered I.T. Practitioner त्यांचेकडून प्रमाणित करुन घेण्यात आले असावे.

**फ) शासन सेवेतून निवृत्त झालेल्या अभियंत्यांचे नोंदणीबाबत नियमावली.**

१) महाराष्ट्र शासन अथवा महाराष्ट्र शासन अंगीकृत महामंडळ/उपक्रमातून सेवानिवृत्त झालेले/राजीनामा दिलेले कार्यकारी अभियंता अथवा त्या वरच्या श्रेणीतील अभियंत हे वर्ग-ड च्या श्रेणीत थेट नोंदणीस पात्र असतील.

२) तसेच त्यापेक्षा निम्न श्रेणीतील अभियंते हे "वर्ग-ई" मधील थेट नोंदणीस पात्र असतील.

३) तसेच पांच वर्षापेक्षा कमी सेवेनंतर राजीनामा दिलेल्या कनिष्ठ अभियंता व वरच्या श्रेणीतील अभियंत्यांना वर्ग-इ मध्ये थेट नोंदणी करता येईल.

तथापी ही सवलत बाब वरील क्र. १, २ व ३ मधील ज्या अभियंत्यांना सक्तीने सेवानिवृत्त/बडतर्फ केले असेल, अशा अभियंत्यांना ही सवलत लागू राहणार नाही. तसेच अभियंत्यांना इतराप्रमाणेच इतर सर्व अटीची पूर्तता करावी लागेल तथापी प्रथम नोंदणी करताना किमान वार्षिक उलाढाल व हातातील कामाची यादी सादर करण्यापासून सवलत राहील.

४) उपरोक्त सवलत ही फक्त सेवानिवृत्ती नंतर ५ वर्षाच्या आत अर्ज करणा-या अभियंत्यांना लागू राहील. तसेच कार्यकारी अभियंता व वरच्या श्रेणीतील अभियंता यांना सेवानिवृत्तीनंतर लगतच्या पहिल्या दोन वर्षापर्यंत शासनाच्या पूर्व परवानगी शिवाय नोंदणी करता येणार नाही.

५) निवृत्त सैनिक अभियंत्यांना वरिल प्रमाणेच १ ते ४ नियम लागू रहातील.

**ग) बेरोजगार यांत्रिकी पदवीधर/पदविकाधारक अभियंते जे महाराष्ट्राचे रहिवाशी आहेत ज्यानी तंत्रशिक्षण संचालक महाराष्ट्र शासन/अथवा मान्यताप्राप्त विद्यापीठाकडून यांत्रिकी पदवी/पदवीका प्राप्त केली आहे. ते वर्ग-ई मध्ये थेट नोंदणीस पात्र आहेत तथापी त्यासाठी त्यांना विहित नमुन्यातील अर्ज सोबत त्यांनी खालील कागदपत्रे जोडावी.**

१. विहित नमुन्यातील अर्ज (जोडपत्र-३ )

२. यांत्रिकी पदवी/पदविका प्रमाणपत्राची सत्य प्रत.

३. निवासी प्रमाणपत्र (Domicile Certificate)

४. ५० % नोंदणी फी भरल्याची पावती

५. अटेस्टेड पासपोर्ट फोटो.

६. राज्याबाहेरील पदवी/पदवीका प्राप्त असल्यास त्या बाबत वैधता प्रमाणित करणारे तंत्रशिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, यांचे प्रमाणपत्र.

उपरोक्त सवलत यांत्रिकी पदवी/पदविका प्राप्त केल्यापासून पहिल्या दहा वर्षापर्यंत लागू राहील.

वरिल "ग" प्रमाणे नोंदणीकृत अभियंत्यांना १) बयाना रक्कमेची सुट राहील व २) सेक्युरिटी डिपॉझीट मध्ये ५० टक्के सुट द्यावी या ५० टक्के सेक्युरीटी डिपॉझीट वसुल करतांना सुरुवातीला कामाच्या अंदाजित रकमेच्या १ टक्के किंवा १००/- रुपये यातील किमान रक्कम वसुल करावी व उर्वरीत रक्कम समप्रमाणात पुढील देयकातुन वसुल करण्यात यावी.

[ **टीपः-** सदर शासन निर्णयातील 'II' कार्यप्रकारातील (उपसा सिंचन योजना पुरवठा, उभारणी व चाचणी इ.कामाच्या) कंत्राटदार नोंदणीसाठी मूळ उत्पादक आवश्यक असल्यामूळे उपरोक्त परिच्छेद फ व ग मधील नियम व अटी हया "अ" कार्यप्रकारातील (व्दार व उच्चालक निर्मीती, उभारणी, दुरुस्ती, सयंत्रे दुरुस्ती तसेच पंपीग यंत्रसामुग्री प्रचलन, निगा व दूरुस्ती इ.) कामांसाठीच्या नोंदणीसाठीच लागू राहतील ]

**ह) दर्जावाढ**

१) कंत्राटदार वर्गातील दर्जावाढ मिळवू इच्छीणा-या कंत्राटदारांनी प्रारंभीक नोंदणीसाठी सादर केलेल्या अर्जाप्रमाणे अर्ज सादर करावेत.सर्व अनुषंगीक कागदपत्रे सादर करुन नोंदणी शुल्काचा भरणा करावा.

२) सक्षम अधिका-याने हाती असलेल्या कामाचे मुल्य व वार्षिक सरासरी उलाढाल लक्षात घेऊन तपासणीअंती गुणवत्तेनुसार एका वर्गामधून दुस-या वर्गामध्ये दर्जावाढ द्यावी. मात्र कंत्राटदाराचे किमान १ काम निम्न दर्जाच्या कमाल मर्यादेपेक्षा जास्त केले असेल अशांच कंत्राटदारांचा दर्जावाढीसाठी विचार करावा.

३) कंत्राटदाराची नोंदणी झाल्यापासून पहिल्या दोन वर्षामध्ये त्याला उच्च प्रवर्गामध्ये दर्जावाढ देण्या बाबत विचार करण्यात येऊ नये. कंत्राटदाराने दर्जावाढीसाठी अर्ज करण्यापूर्वी त्यांच्या विद्यमान प्रवर्गामध्ये वर उल्लेख केल्या प्रमाणे काही मोठी कामे पार पाडून, त्यांची दर्जावाढीसाठी क्षमता सिध्द करावी. तथापि कंत्राटदाराच्या कामाची गुणवत्ता सिध्द झाल्यास “विशेष बाब” म्हणून नोंदणी प्राधिकारी सदर दोन वर्षासाठीची अट शिथील करु शकतील.

४) वरीलप्रमाणे गुणवत्तेवर दिलेली दर्जावाढ प्रतिकूल परिस्थीती सोडून दर्जावाढ मंजूर करणा-या आदेशाच्या तारखेपासून ५ वर्षाच्या कालावधीसाठी विधीग्राहय असेल

**ज) नुतनीकरण**

१) नोंदणीच्या नुतनीकरणासाठी कंत्राटदारांनी नोंदणीच्या विधीग्राहयतेची समाप्ती होण्यापूर्वी तीन महिन्याच्या आत नवीन पतदारी प्रमाणपत्र व नवीन नोंदणीच्या प्रमाणे आवश्यक ती सर्व कागदपत्रासह योग्य विहित नमुन्यात कार्यकारी अभियंता यांचेकडे अर्ज सादर करावेत आणि आवश्यक नोंदणी शूल्क भरावे.

कार्यकारी अभियंता यांनी नुतनीकरणासाठी आलेले प्रस्ताव आवश्यक ती पडताळणी करुन अंतीम मान्यतेसाठी योग्य मार्गाने प्रारंभीक नोंदणी मंजूर करणा-या सक्षम अधिका-याला सादर करावेत.

२) असे प्राप्त प्रस्तावाची सक्षम अधिका-यांकडे शिफारस करणा-या अधिका-यांनी वार्षिक उलाढालीप्रमाणे कंत्राटदाराने शासकीय/ निम शासकीय/खाजगी पुर्ण केलेली कामे व हाती असलेल्या कामाचे मुल्य इत्यादी बाबतची छाननी करावी.

३) नुतनीकरण प्रस्ताव मंजूर करण्यापूर्वी कंत्राटदारांचे कार्यसिध्दी प्रमाणपत्र (Performance Certificate) विचारात घ्यावेत.

४) सक्षम प्राधिका-याने नोंदणीच्या नुतनीकरणास मान्यता दिली असेल तर ते नुतनीकरण पूढील २ वर्षाच्या कालावधीसाठी विधीग्राहय असेल आणि नोंदणी शुल्काची शिल्लक रक्कम अदा केल्यानंतर संबधीत सक्षम प्राधिका-याने कंत्राटदाराला नुतनीकरण प्रमाणपत्र द्यावे.

५) विलंब टाळण्याच्या उद्देशाने दर्जावाढ व नोंदणीचे नुतनीकरणासाठी कंत्राटदाराने वेगवेगळे अर्ज करावेत. दोन्ही उद्देशासाठी एकच एकत्रित अर्ज करु नये.

६) कंत्राटदारांनी त्यांच्या नोंदणीची मुदत संपण्यापूर्वी ३ महिन्याच्या आत नोंदणीच्या नुतनीकरणासाठी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज केले असतील परंतु सक्षम प्राधिका-याकडून कार्यवाही करण्यामध्ये विलंब झाला असेल, तर नोंदणीची विधीग्राहयता आणखी १८० दिवसांनी वाढवून यापूर्वीच पात्र असलेल्या कंत्राटदारांना कामासाठी निविदा भरण्यास मुभा देता येईल. तथापी हा कालावधी त्यापुढे वाढविला जाणार नाही.

७) कंत्राटदाराने आपल्या नोंदणीच्या नुतनीकरणासाठी विहित कालावधीत अर्ज केला नसेल तर त्यांची नोंदणी रद्द म्हणून समजण्यात यावी आणि त्याला नोंदणीसाठी नव्याने अर्ज करावा लागेल.

## ● इतर नियम

१) नोंदणी करणारे नोंदणी मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी, नोंदणीकृत कंत्राटदारांचे नांव, पत्ते असलेले रजिस्टर जोडपत्र-४ प्रमाणे ठेवतील. नोंदणी अधिकारी, वर्षातून एकदा अशा कंत्राटदारांची यादी सर्व विभागांना पाठवतील व त्यानंतर त्यात झालेल्या बदलांची माहिती वेळोवेळी कळविल. प्रत्येक वर्षी १ जुलै दरम्यान वा गरजे प्रमाणे इतर वेळी देखील नोंदणी मंजूर करणा-या अधिका-याव्दारे सदरचे रजिस्टर तपासले जाईल.

२) निविदा सादर करतेवेळी किंवा कामाच्या अंमलबजावणीच्या वेळी कंत्राटदाराने विशिष्ट चूक केल्याचे किंवा कसूर केल्याचे आढळून आल्यास किंवा कंत्राटदारांची आर्थिक परिस्थिती किंवा तांत्रिक क्षमता खालावली असल्यामुळे नोंदवहीतून त्यांचे नांव काढून टाकणे आवश्यक असल्याचे किंवा त्यांचे नांव निम्न वर्गामध्ये घालणे आवश्यक असल्याचे वाटत असल्यास त्या प्रमाणे त्याच्यावर कार्यवाही का करण्यात येऊ नये या बाबत नमुद केलेल्या कालावधीत कंत्राटदारास खुलासा मागविण्यात येईल. खुलासा विचारात घेऊन त्यानंतर वरील प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. प्रारंभीची नोंदणी मंजूर करणा-या अधिका-याने त्या कंत्राटदारास काढून टाकण्याची किंवा त्यांना निम्न प्रवर्ग देण्याबाबत उचीत कार्यवाही करावी व त्याबाबत सर्व संबधीताना कळविण्यात यावे. जेंव्हा कंत्राटदारांचे नांव मान्यताप्राप्त कंत्राटदारांच्या सुचीतून काढून टाकण्यात येईल किंवा त्याला निम्न वर्गामध्ये घातले जाईल त्यावेळी नोंदणी शुल्काची कोणतीही रक्कम कंत्राटदाराला परत मिळण्याचा हक्क असणार नाही.

३) ज्या कंत्राटदारांनी तीन वर्षाच्या कालावधीसाठी कोणत्याही कामाच्या निविदा भरलेल्या नाहीत किंवा निविदा भरलेल्या आहेत तथापी या कालावधीमध्ये त्या शासकीय किंवा निम शासकीय संस्थाचे कोणतेही कंत्राट त्यांना मिळालेले नाही, अशा कंत्राटदारांची नांवे मान्यताप्राप्त कंत्राटदारांच्या नोंदवहीतून काढून टाकण्यात यावेत.

४) नोंदणी करणा-या अधिका-याला पाहणी करण्यासाठी सुलभ व्हावे या उद्येशाने ज्या विभागामध्ये कंत्राटदाराने विवरणामध्ये दर्शविण्यात आलेली कामे पार पाडली आहेत त्या कार्यकारी अभियंताकडून कंत्राटदाराच्या आलेल्या कामगीरी बाबत अभिप्रायासह जोडपत्र-६ मध्ये विहित करण्यात आलेल्या नमुन्यात दरवर्षी मार्च अखेरीपर्यन्तचे विवरण दरवर्षी ३० एप्रिल रोजी नोंदणी करणा-या अधिका-याला, त्याच प्रमाणे संबधीत अधिक्षक अभियंता यांना सादर करण्यात यावे. सर्व कंत्राटदार योग्य दिनांकास आवश्यक विवरण सादर करतात आणि योग्य ती तपासणी झाल्यावर ते विवरण नोंदणी करणा-या अधिका-याकडे पाठवतील. या विषयी अधिक्षक अभियंता यांनी खातरजमा करावी.

५) कंत्राटदारांचे काम समाधानकारक नसेल त्या बाबतीत अशी कामे वार्षिक विवरणपत्रातून कंत्राटदाराकडून वगळली जाण्याची शक्यता आहे. कंत्राटदाराचे कार्य समाधानकारक नसते त्यावेळी त्याला निम्न श्रेणी देण्यासंबधी किंवा विशिष्ट प्रवर्गातून त्यांचे नांवे काढून टाकण्यासंबधी एखादी कार्यवाही आवश्यक आहे असे निदर्शनास येते त्यावेळी संबधीत कार्यकारी अभियंता कंत्राटदारा विरुध्द आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी प्रारंभीक नोंदणी मंजूर करणा-या अधिका-याला ही बाब तपशिलवारपणे थेट कळवतील.

६) ज्या कंत्राटदारांचे नांव काढून टाकण्यात आले आहे, अशा कंत्राटदारांना त्यानंतर कंत्राटे घेण्याची इच्छा असेल तर त्या कंत्राटदारांनी विहीत शुल्कांची रक्कम भरुन आवश्यक कागदपत्रासह पुन्हा नोंदणी करण्यासाठी अर्ज करावेत. अशा प्रकारच्या अर्जाचा त्यांच्या गुणवतेनुसार विचार करण्यात येईल. मात्र अशा कंत्राटदाराला नोंदणी रद्द केल्याच्या दिनांकापासून कमीत कमी एक वर्ष पुर्ननोंदणी करता येणार नाही.

७) एखाद्या सक्षम प्राधिका-याने ज्या कंत्राटदाराची नोंदणी नामंजूर केली असेल/ रद्द केलेली असेल किंवा त्यात अवनती (निम्नवर्ग) केली असेल तर त्या कंत्राटदारास सचिव जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुबंई यांचेकडे त्या आदेशा विरुध्द अपील करता येईल.

८) या शासन निर्णय व्यतिरिक्त, शासनाचे कंत्राटदार नोंदणी बाबतचे सर्व प्रचलित नियम देखील लागू राहतील.

९) बयाना रक्कम भरण्यापासनू सुट मिळण्यासाठी खालील प्रमाणे तक्ता वापरावा. तक्त्यातील डिपॉझ्रीट हे राष्ट्रीयकृत

बचत प्रमाणपत्र / इंट्रेस्ट बेंअरिंग सिक्युरिटींज , पोस्टल सेव्हींग बँक पास बुक इत्यादी मध्ये असावे .

| वर्ग | व्दारे व उच्चालक निर्मीती,उभारणी,दूरुस्ती,सयंत्रे दूरुस्ती तसेच पंपीग यंत्रसामुग्री प्रचलन, निगा, दूरुस्ती इ. कामांसाठी बयाना रक्कम( ठेव रक्कम) सुट. ( रुपये लक्ष ) | वर्ग | उपसा सिंचन योजना पुरवठा,उभारणी,व चाचणी या कामासाठी बयाना रक्कम ( ठेव रक्कम) सुट. ( रुपये लक्ष ) |
|---|---|---|---|
| **अ** | **३** | **अ** | **५** |
| **ब** | **२** | **ब** | **३.५** |
| **क** | **१.५** | **क** | **३** |
| **ड** | **२.१५** | --- | ---- |
| **इ** | **लागु नाही** | ---- | ----- |

**सहपत्र :**

१. परिशिष्ट-३ Application for enrolment as Mechanical Contractor

२. परिशिष्ट-४ Register of approved contractors (Classwise)

३. परिशिष्ट-५ Application Form to Enrolment for Mechanical Contractor who is Un-employed Mechanical Engineers { *NOT APPLICABLE IN CASE OF REGISTRATION OF CONTRACTORS FOR LIFT IRRIGATION SCHEMES SUPPLY, ERECTION AND TESTING WORKS.}*

४. परिशिष्ट-६ Annual return for period ending March to be susbmitted before 30th April by a Registered Govt.registering authority showing works in hand and works,tendered during the year

५. परिशिष्ट-७ कंत्राटदार नोंदणी/नुतनीकरणासाठीची माहिती.

६. परिशिष्ट-८ कंत्राटदार नोंदणी पडताळणी अहवाल

७. परिशिष्ट-९ List of documents to be attached

## परिशिष्ट-३

Application for enrolment as Mechanical Contractor

1. Name of applicant and full address.

2. Wheter the firm is a joint stock company, undivided Hindu Family,individual or a registered partnership firm.( Attested copy of deeds or ariticles of association to be enclosed.)

3. Name of person holding the power of attorney (attested copy of power of attorney to be enclosed)

4. Name of sole proprietors/partners with particulars/liabilities. (attested copy of partnership deed to be enclosed)

5. Name of bankers and full address.

6. Place of Business.

7. Class in which enrollment is sought.

8. Whether the contractor desires to deposit lump-sum for securing exemption from payment of earnest money or will pay earnest money along with each tender.

9. List of works undertaken/executed during a period of 3 years preceding the date of application.

    A) Name of work }
    B) Amount of work put to tender }
    C) Date & year of commencement } To be shown in separate
    D) Amount spent during each of last 3 years } statement.
    E) Amount of work still remaining to be executed. }

Note.:- Original or attested copies of Certificate Of verification of above details by the officers Under whom work are carried out to be Enclosed.(Photostat should also be attested by the gazetted officer in the Division where the application is made.)

10 List of tools and plants in possession of the contractor( attach sparate list.)

11. Technical qualification and experience of the proprietor or partners and details of technical employees in the firm (attach separate list)

12. Workshop,machines,tools and plant owened by the applicant (Location and site of workshop and also full details regarding machines,tools etc. to be given (Attach separate sheets.)

13. Whether enlisted in any other Department/Organisation/Other state. If So in which category,showing the amount Qualified to tender.

14. a) Has the applicant or his partners or Directors been blacklisted in the Past by any Government Department/ Organisation/Other state.

b) Has the applicant applied for registration elsewhere in his name or others name if so whether the application is rejected give particulars.

15. Whether the applicant has produced uptodate income tax clearance certificate.

16. Amount of the solvency certificate which the applicant has held or has produced.

17. I / We certify that I/We have been not and will not get my self/ourselves registered as contractor in the Department under more than one name.

( Signature of Applicant and full address)

# परिशिष्ट-४

Register of approved contractors (Classwise)

**Name of Division.:-**

| Sr. No. | Name of Contractor & address | Authority for registration | Date on which the fees was credited | Solvency date | Certificate amount | Class of Contractor | Remarks | Sign.of Executive Engineer. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| | | | | | | | | |

# परिशिष्ट-५

## Application Form to Enrolment for Mechanical Contractor who is Un-employed Mechanical Engineers.

{ *NOT APPLICABLE IN CASE OF REGISTRATION OF CONTRACTORS FOR LIFT IRRIGATION SCHEMES SUPPLY, ERECTION AND TESTING WORKS.}*

1. Name of Applicant,Present and permanent Address.

2. Date of Birth.

3. Place of Birth.

4. Technical Qualification with year of passing ( Degree/Diploma/Name of Institute/University)

5. Place of Business.

6. Name of Bankers and full Address.

7. Class in which enrollment is sought

8. Wheter enlisted in the Department or any other Organisation. If so, state the Category and enclose copy of certificate.

I certify that I have not been/will not get myself registered as contractor in the department under more than one name

Signature of Applicant

Enclosures.

1. Ceritified copy of Degree/Diploma (Mechanical) Certificate.
2. Ceritified copy of Domicile Certificate.
3. Certificate from Director,Technical Education,Government of Maharashtra if Degree/Diploma is obtained from University/Polytechnic of state/Union Territory other than Maharashtra state.
4. 3 Copies of passport size photos.
5. Xerox copy of receipt of registration fee.

( Note :- The applicant can show the original copy while submitting application and have it certified by Executive Engineer’s Office also)

# परिशिष्ट-६

Annual return for period ending March to be susbmitted before 30th April by a Registered Contractor to the registering authority showing works in hand and works,tendered during the year

Name of Contractors :-

Authority for Registration. :- Class :-

| Name of work | Name of Division | Amount put to tender Rs. | Tendered Amount Rs. | Date of award of contract if awarded | Present stage of work | Remarks. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| | | | | | | |

**यांत्रिकी कंत्राटदार नोंदणी/नुतनीकरणासाठीची माहिती.** **परिशिष्ट-७**

| अक्रं | कंत्राटदाराचे नांव व पत्ता | जागेचा मालकी संबंधी तपशिल व क्षेत्रफळ | शॉप ॲक्ट नोंदणी क्रमांक | आयकर नोंदणी क्रमांक | मुल्यवर्धित कर नोंदणी क्रमांक | एस.एस. आय नोंदणी क्रमांक | व्यवसाय कर नोंदणी क्रमांक | गेल्या ३ वर्षात केलेल्या शासकीय/ निमशासकीय व खाजगी कामाचा तपशील | पुर्वी केलेले काम चांगल्या दर्जाचे, वेळेवर केल्याचे प्रमाणिकरण | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| | | | | | | | | | | |

सदस्य
छाननी समिती

सदस्य
छाननी समिती

सदस्य
छाननी समिती

अध्यक्ष
छाननी समिती

## यांत्रिकी कंत्राटदार नोंदणी पडताळणी अहवाल परिशिष्ट-८

| | | | |
|---|---|---|---|
| १ | यांत्रिकी कंत्राटदाराचे/फर्मचे नांव व पत्ता | : | |
| २ | जागेचा मालकी हक्क/भाडे करारनामा तपशील | : | |
| ३ | दुकाने अधिनियम नोंदणी क्रमांक : | : | |
| ४ | आयकर प्रमाणपत्र व पॅन क्रमांक : | : | |
| ५ | व्हॅट नोंदणी प्रमाणपत्र क्र. व तपशील | : | |
| ६ | व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्र व तपशील | : | |
| ७ | सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र व तपशील | : | |
| ८ | सॅालव्हेन्सी तपशील | : | |
| ९ | केलेल्या कामाचे वार्षिक सरासरी मुल्य | : | |
| १० | हाती असलेल्या कामाचे मुल्य | : | |
| ११ | तांत्रिक मनुष्य बळ, अर्हता, अनुभव व पदनाम, तपशील | : | |
| १२ | मनुष्य बळ वेतन पट तपशिल | : | |
| १३ | नोंदणी शुल्क भरलेला तपशील | : | |
| १४ | यांत्रिकी कर्मशाळा व उपलब्ध तांत्रीक सुविधा तपशील | : | |
| १५ | एस.एस.आय.नोंदणी क्रमांक : | : | |
| १६ | सयंत्रे व हत्यारे उपलब्धता तपशील | : | |
| १७ | कंत्राटदाराच्या कामाचा पुर्वानुभव | : | |
| १८ | नोंदणी वर्गा बाबतचा छाननी समितीचा अभिप्राय | : | |

**LIST OF DOCUMENTS TO BE ENCLOSED**.

## परिशिष्ट-९

| | | |
|---|---|---|
| 01 | Solvency Certificate for an appropriate amount ( It shall be to valid for only one year from the date of it's issue) | Yes/No |
| 02 | Attested copy of deed of partnership and power of attorney/Ariticles and Memorandum of Association/Affidavit on stamp paper in case the individual is sole proprietor of the firm. | Yes/No |
| 03 | Current Income Tax Clearance Certificate | Yes/No |
| 04 | Works certificate for all works done during last 3 years and which are in progress | Yes/No |
| 05 | Application in duplicate with all required documents | Yes/No |
| 06 | Attested photos of all the partners/directors/individual. | Yes/No |
| 07 | Attested copy of VAT Registration Certificate | Yes/No. |
| 08 | Attested copy of valid electrical licences | Yes/No |
| 09 | Attested copy of valid professional Tax Certificate (As per Rule 3) for appropriate class only while Registration & Renewal. | Yes/No |
| 10 | Affidavit stating the contractor is not Blacklisted in any other Government/Semi Government Organization. | Yes/No |
| 11 | List of Technical staff | Yes/No |
| 12 | List of machinery & Workshop | Yes/No |